देशोन्नती बुलडाणा / रविवार दि. २५ ऑगस्ट २

# श्री शिवाजी कॉलेजमध्ये ३०० वृक्षांची लागवड

*तालुका प्रतिनिधी/२४ ऑगस्ट*

**चिखली** : स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय रासेयो व महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन. बी.भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली 'एक वृक्ष एक सेवक' या संकल्पनेला मुर्त रुप देण्याच्या उद्देशाने ३०० वृक्षांची लागवड करण्यात आली.

त्यामध्ये कडुनिंब, गुलमोहर, जागरडा, पिंपळ, वड,बांबु इ.वृक्षांची लागवड करण्यात आली.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी कठोर परिश्रम केले.